
दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १७० • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार, दि.२४ एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# हल्ला झाला तेव्हा गुप्तचर संस्था काय करत होत्या ?:पर्यटकांना टार्गेट करून ठार मारले

## काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांचा सरकारवर घणाघात

नागपूर (वृत्तसंस्था)–दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये एवढा मोठा हल्ला करत असताना आपल्या गुप्तचर यंत्रणा काय करत होत्या ? हजारो पर्यटक काश्मीरमध्ये पर्यटनासाठी जात असताना त्यांची सुरक्षेची व्यवस्था का केली गेली नाही ? असे कळीचे प्रश्न काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करताना उपस्थित केले आहेत.विजय वडेट्टीवार म्हणाले की, ४–६ दहशतवादी येतात हल्या करत पर्यटकांना टार्गेट करत मारतात, आणि निघून जातात हे सर्व काही निंदनीय आहे. सरकारने ह्या विषयाकडे गांभीर्याने पाहायला हवे. यामागे जो कोणी असेल त्याला सोडू नये. पुलवामा हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये मंगळवारी सर्वात मोठा दहशतवादी हल्ला झाला. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला, ज्यामध्ये २७ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एक इटालियन आणि एक इस्त्रायली पर्यटक आणि दोन स्थानिक नागरिकांचा समावेश आहे. उर्वरित पर्यटक गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू आणि ओडिशातील आहेत.यावर बोलताना त्यांनी हे मत व्यक्त केले आहे.



### दोन धर्मांमध्ये भांडण लावण्याचा सरकारचा प्रयत्न


विजय वडेट्टीवार म्हणाले की, पहलगाममध्ये हल्ल्याच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांकडून देशाची एकात्मता खंडित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. २ धर्मांना एकमेकांच्याविरोधात उभे करत भांडण लावण्याचा या सरकारचा प्रयत्न दिसून येत आहे, असा आरोप वडेट्टीवारांनी केला आहे.

### अतिरेक्यांवर दहशत बसावी– राज ठाकरे



राज ठाकरे म्हणाले की, १९७२ साली म्युनिक ऑलिम्पिकच्या वेळेस इस्त्रायली खेळाडूंवर पॅलेस्टिनी अतिरेक्यांनी हल्ला केला... यानंतर इस्त्रायलने या अतिरेक्यांना, या हल्ल्याच्या सूत्रधारांना अशा पद्धतीने मारलं होतं की पुढे दीर्घकाळ पॅलेस्टिनी लोकांच्या मनात दहशत बसली होती. तशीच दहशत येथे देखील बसवण्याची अपेक्षा आहे.

### ज्यांनी हल्ला केला, त्या सर्वांना टिपून टिच्चून काढा–आमदार जितेंद्र आव्हाड



आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले की, 'सध्या सुट्यांचा हंगाम सुरू असल्याचा फायदा घेत भारतीय संघ राज्याचा अविभाज्य घटक असलेल्या जम्मू काश्मीरमध्ये सर्व सामान्य पर्यटकांवर भ्याड दहशतवादी हल्ला करण्यात आला त्याचा तीव्र निषेध..सोबतच ज्यांनी आमच्या देश बांधवांवर हल्ला केला त्या सर्वांना टिपून टिच्चून काढा, जाहीर पाठिंबा'

# चंद्रपूरचे सात नागरिक पहलगाममध्ये अडकले आ.किशोर जोरगेवार यांनी घेतली तत्काळ दखल

## चंद्रपुरात परत आणण्याच्या हालचालींना वेग;आ.जोरगेवार काश्मीर प्रशासनाच्या संपर्कात

**चंद्रपुर । प्रतिनिधी**

जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे अनेक पर्यटक तिथे अडकले आहेत. अशा संकटात चंद्रपूर शहरातील तीन कुटुंबांतील सात नागरिक देखील पहलगाम येथे अडकले असून, त्यांना चंद्रपूरला परत आणण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांच्या तत्पर प्रयत्नांमुळे हालचालींना वेग आला आहे.

दरवर्षी लाखो पर्यटक काश्मीर पर्यटनासाठी जात असतात. यंदाही काश्मीर खोऱ्यात पर्यटकांची गर्दी असताना पहलगाम येथे दहशतवादी हल्ला करण्यात आला. त्यामुळे अनेक पर्यटक तिथे अडकले आहेत. यामध्ये चंद्रपूर शहरातील तीन कुटुंबांतील सात सदस्य अडकले असल्याची माहिती मिळताच,



आमदार किशोर जोरगेवार यांनी तात्काळ व्हिडिओ कॉलद्वारे संबंधित कुटुंबांशी संपर्क साधून त्यांच्या सुरक्षिततेची चौकशी केली. यावेळी आम्ही हल्ल्याच्या ठिकाणाजवळच थांबलेलो होतो. आम्हाला चंद्रपूरला परत यायचे आहे, मात्र सध्याचे वातावरण पाहता ते शक्य नाही. आम्ही घाबरलो आहोत असे त्यांनी आमदार जोरगेवार यांना सांगितले.

ही बाब गांभीर्याने घेत आमदार जोरगेवार यांनी तात्काळ हालचाली सुरू केल्या. त्यांनी मदत व पुनर्वसन विभागाचे संचालक सतीशकुमार खडके आणि तसेच जम्मू–काश्मीर येथील प्रशासनाशी थेट दूरध्वनीद्वारे संपर्क साधून या कुटुंबाच्या सुटकेसाठी आवश्यक ती सर्व मदत करण्याची विनंती केली. सदर कुटुंब थांबलेले स्थान आणि त्यांची सर्व माहिती आमदार जोरगेवार यांनी जम्मू–काश्मीर प्रशासनाला दिली. त्यानंतर स्थानिक प्रशासनाने संबंधित कुटुंबीयांशी संपर्क साधल्याची माहितीही समोर आली आहे.

आमदार जोरगेवार यांच्या तत्परतेमुळे या कुटुंबांच्या सुरक्षित चंद्रपूरकडे परतीच्या हालचालींना गती मिळाली आहे. अंकीत नगराळे, शिल्पा नळे, स्पर्श नळे, प्रितेश नळे, अजय गाडीवान, वर्षा गाडीवान, तेजस्विनी गाडीवान असे या कुटुंबियांची नावे असून ते नागीनाबग येथील रहिवासी आहेत. हे कुटुंब सुरक्षितपणे घरी परतेपर्यंत मी सातत्याने प्रशासनाशी संपर्कात राहणार असून, त्यांना आवश्यक ती प्रत्येक मदत दिली जाईल.असे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

# उद्धव ठाकरे यांचं वाईट राजकारण नसतं तर आम्ही आजही अभिमानाने शिवसैनिक म्हणवले असतो–नीतेश राणे यांचं स्फोटक विधान

**मुंबई । विराम पवार**

राज्यातील मत्स्य व बंदरे खात्याचे कॅबिनेट मंत्री नीतेश राणे यांनी एबीपी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत अनेक मुद्द्यांवर परखड मतं व्यक्त केली. मुलाखतीदरम्यान उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर रुह अफजा की गुलाब शरबत? असा हलकाफुलका प्रश्न विचारण्यात आला. यावर उत्तर देताना राणे म्हणाले, मी गोमूत्र फार पितो. आरोग्यासाठी ते अत्यंत उपयुक्त आहे.

पुढे ते म्हणाले, रुह अफजा किंवा गुलाब शरबत मला कोण देतं, यावर बरंच काही अवलंबून असतं. मला कोणीही चांगल्या भावनेने रुह अफजा पाजणार नाही. तो मला फार गोडही वाटतो, आणि आवडत नाही.

राजकीय प्रश्नांना उत्तर देताना नीतेश राणे म्हणाले, आमच्यावर आरोप होतो की आम्ही पक्ष बदलतो, पण आम्ही ३९ वर्षे बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबत होतो. उद्धव ठाकरे यांनी आमच्यासोबत जर वाईट राजकारण केलं नसतं, तर आजही आम्ही गर्वाने सांगितलं असतं की आम्ही शिवसैनिक आहोत.



माझ्या वडिलांनी हिंदुत्वासाठी जे केलं आहे ते मी पॉडकास्टमध्ये सांगू शकत नाही. आमचं रक्तच भगवं आहे, कारण आम्ही बाळासाहेबांच्या विचारांमध्ये वाढलो आहोत. काँग्रेसमध्ये १२ वर्ष राहिलो, कारण पर्याय नव्हता. पण त्या काळातही आमचं रक्त भगवंच होतं. आता भाजपमध्ये असल्याचा अभिमान आहे, असंही राणे यांनी स्पष्ट केलं.

# २८ एप्रिल २०२५ रोजी जिल्ह्यात साजरा होणार सेवा हक्क दिन

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम आपली सेवा आमचे कर्तव्य

**चंद्रपुर । प्रतिनिधी**

जिल्ह्यांतील जिल्हास्तरावरील तसेच ग्राम पातळीवरील सर्व कार्यालयात येत्या २८ एप्रिल रोजी सेवा हक्क कायद्याची दशकपूर्ती व पहिला 'सेवा हक्क दिन' साजरा करण्यासाठी शासनाने निर्धारीत केलेले विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी संबंधित विभाग प्रमुख यांना दिल्या आहेत.



पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि व्यक्तींना पात्र लोकसेवा देणाऱ्या शासकीय विभागांमध्ये पादर्शकता व उत्तरदायित्व आणण्यासाठी राज्यात २८ एप्रिल २०१५ पासून लोकसेवा हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्य शासनाने या वर्षीपासूनच २८ एप्रिल हा दिवस 'सेवा हक्क दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे आणि या कायद्याची दशकपूर्तीही होत आहे. या निमित्ताने चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, जिल्हा प्रशासन, महानगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायतांच्या कार्यक्षेत्रांमध्ये सेवा हक्क दिनानिमित्ताने विशेष सभेचे आयोजन करून या कायद्यात अंतर्भूत लोकसेवा हक्क कायद्याचे वैशिष्ट्ये विषद करणे आणि विविध विभागांकडून देण्यात येणाऱ्या सेवांच्या आढावा घेवून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांचा सत्कार करणे, जिल्ह्यात नागरिकांना घरपोच सेवा देण्यासाठी 'सेवादूत' योजना सुरू करणे, नागरिकांना एसएमएसद्वारे सेवा हक्क कायद्याबाबत व आपले सरकार पोर्टलची माहिती देणे, शाळा व महाविद्यालयांमध्ये या कायद्याच्या जागृतीसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणे, लोककलांद्वारे या कायद्याचा प्रचार–प्रसार करण्याबाबत सूचित केले आहे.सेवा हक्क दिनाच्या निमित्ताने ग्रामपंचायत स्तरावर आदर्श आपले सरकार केंद्राचे उद्घाटन करणे, विशेष ग्रामसभेचे आयोजन करून लोकसेवा हक्क कायद्याच्या ठळक तरतूदींचे वाचन करून ग्रामपंचायत सदस्यांना कायद्याच्या प्रती वितरीत करणे, प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये,पर्यटन व तिर्थस्थळे, शाळा महाविद्यालय परिसर, गर्दीचे ठिकाणी, बस स्टेशन आदी ठिकाणी या कायद्याची, अधिसूचित सेवांची व शुल्काची माहिती देणारे सूचना फलक लावणे, क्यू आर कोड लावण्याबाबत तसेच असे विविध उपक्रम राबविण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.जिल्हास्तरावर सेवा हक्क दिन नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात येत आहे.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पत्रानंतर बदलल्या शाळेच्या वेळा

## ना.मुनगंटीवार जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी सरसावले

## जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने जारी केल्या सूचना

**चंद्रपुर । प्रतिनिधी**

राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांची समाजप्रती असलेली संवेदनशीलता पुन्हा एकदा प्रकर्षाने दिसून आली आहे. विकासकामांसाठी नेहमीच तत्पर असलेल्या आ. मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त केली होती. वाढत्या तापमानाचा विचार करून शालेय विद्यार्थ्यांना उष्माघाताचा धोका टाळण्यासाठी त्यांनी शाळेच्या वेळा बदलण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे विनंती केली होती.या पत्राची तत्काळ दखल घेत, अवघ्या काही तासांतच शाळेच्या वेळांबाबतचा आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये कमालीचे तापमान असल्याने प्राथमिक व माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांना वेळेत मुभा देण्याबाबत आ. मुनगंटीवार यांनी पत्र लिहिले होते. गेल्या काही दिवसांपासून चंद्रपूर जिल्ह्याचे तापमान



४५ अंशापेक्षा जास्त असल्याने शाळकरी विद्यार्थ्यांना उष्माघातासारखे अनेक आजार होत असल्याचे दिसून येत आहे. उष्माघाताचे प्रमाण सातत्याने वाढणे योग्य नाही. त्यामुळे प्राथमिक व माध्यमिक शाळांना सुट्टी देण्यात यावी किंवा शाळेचे दुपारचे तास कमी करणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी पत्रात म्हटले आहे. या संदर्भात तातडीने कार्यवाही करण्यात यावी, असेही त्यांनी सूचविले होते.

चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने (प्राथमिक) उष्णतेच्या लाटेसंदर्भात मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. 'चंद्रपूर जिल्ह्यामध्ये नैसर्गिक आपत्ती घोषित करण्यात आली असून सद्या जिल्हयाचे तापमान ४५ डिग्रीपेक्षा अधिक आहे. त्यामुळे उष्णतेच्या लाटेच्या कालावधीत सर्व व्यवस्थापनाच्या शाळा, महाविद्यालय सकाळी १० वाजेपर्यंतच सुरु ठेवण्यात यावे,' असे या आदेशात म्हटले आहे.हवामान खात्याकडून आलेल्या माहितीनुसार शाळा महाविद्यालयांच्या वेळांचे नियोजन करावे. थंड वर्गखोल्या, प्रथमोपचार आणि पिण्याच्या पाण्याची सोय करावी. शाळेच्या वेळांमध्ये बदल करून उष्णतेच्या लाटेच्या परिस्थितीनुसार सुट्टी देण्यात यावी. उन्हाळ्यात विदयार्थ्यांनी मैदानी शारीरिक हालचाली टाळाव्यात. बाहेर मैदानात वर्ग घेऊ नयेत. दुपारच्या सत्रात मैदानावरील खेळांचे नियोजन करू नये, आदी सूचनांचा देखील यामध्ये समावेश आहे.

# मुख्याधिकाऱ्यांच्या आदेशाने भिसीतील अतिक्रमणावर कारवाई

## धनराज मुंगले, अरविंद रेवतकर यांच्या इमारतीवर हातोळा

**चिमूर । प्रतिनिधी**

भिसी (ता. चिमूर) येथील मुख्य रस्त्यालगतच्या अतिक्रमणांवर २१ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता नगरपंचायत प्रशासनाने कडक पोलीस बंदोबस्तात कारवाई केली. मुख्याधिकारी अर्चना वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.कारवाईची सुरुवात धनराज मुंगले यांच्या इमारतीपासून झाली. मात्र त्यांच्या कुटुंबीयांनी अतिक्रमण हटविण्यास विरोध केल्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला. अखेर पोलिसांच्या बंदोबस्तात बाहेरील सज्जे तोडण्यात आले.यानंतर मोर्चा अरविंद रेवतकर यांच्या इमारतीकडे वळवण्यात आला. परंतु घराला आणि दुकानाला कुलूप असल्यामुळे प्रशासनाने तीनदा जाहीर सूचना दिल्या. कोणीही प्रतिसाद न दिल्याने प्रशासनाने कुलूप तोडले. कापड दुकानातील काही माल बाहेर काढण्यात आला. मात्र यामध्ये वेळ लागणार असल्याची जाणीव होताच माल काढणे थांबवून इमारत पाडण्यास सुरुवात करण्यात आली. दुपारी ४ वाजताच्या सुमारास कोर्टाची स्थगिती मिळताच ही कारवाई तातडीने थांबवण्यात आली. त्यानंतर मुख्य रस्त्यालगतचे इतर सज्जे हटवण्यात आले.दरम्यान, काही नागरिकांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली. रस्त्यावर सेंटरलाइन काढलेली आहे, त्यानुसार दोन्ही बाजूंनी सारखी कारवाई व्हावी, पक्षपात नको, अशी मागणी त्यांनी केली. काही नागरिकांनी सुरुवातीपासून सर्व अतिक्रमण हटवण्याची मागणी प्रशासनाकडे केली.



“ रस्त्याला सेंटरलाईन मारलेली आहे. त्यानुसार दोन्ही बाजूंनी सारखी कारवाई व्हावी. आम्ही आमच्या मालकीचे कागदपत्रे नगरपंचायतीकडे दिले आहेत. कुणावरही अन्याय होऊ नये,
– ज्ञानेश्वर शिरभय्ये, कापड व्यावसायिक, भिसी.

### सुरक्षिततेसाठी भक्कम बंदोबस्त

या कारवाईसाठी दोन उपविभागीय अधिकारी, एक पोलीस निरीक्षक, एक आरसीपी पथक, चिमूर, शेगाव, भद्रावती, दुर्गापूर, पोलीस मुख्यालय, सिटी पोलीस व पीएस आदींच्या ४० कर्मचाऱ्यांसह भिसी पोलीस ठाण्याचे एपीआय, दोन पीएसआय व १५ कर्मचारी अशा एकूण ८७ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# मोहोळ तालुक्यात ग्रामीण भागांत वीजबिल वितरणात खोळंबा

## वेळेवर वीजबिल न मिळाल्याने ग्राहक त्रस्त; दंड व मनस्ताप वाढतोय

**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यातील चिखली, हिवरे व इतर ग्रामीण भागांतील वीजग्राहक सध्या वेळेवर वीजबिल न मिळाल्यामुळे त्रस्त झाले आहेत. महिनोंमहिने वीजबिल न मिळाल्याने ग्राहकांना एकरकमी जास्त रक्कम भरावी लागत असून, नाहक दंडाचा भुर्दंडही सहन करावा लागत आहे.गेल्या काही महिन्यांपासून चिखली, हिवरे व परिसरात वीजबिल वेळेवर मिळत नसल्याचे चित्र आहे. काही वेळा एक, तर काही वेळा दोन महिन्यांनंतर वीजबिल दिले जात आहे. परिणामी, ग्राहकांवर दंडात्मक रक्कम लादली जात असून, वेळेवर बिल मिळाले नाही तरीही त्यांना वेळेवरच भरावे लागते. त्यामुळे नागरिक आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जात आहेत.

ग्राहकांना वेळ वाया घालवत महावितरण कार्यालयात जाऊन बिल घ्यावे लागत आहे. मात्र, तेथेही कर्मचारी कमी असल्यामुळे उशीर होतो. वीज वितरणाचे काम खाजगी कंत्राटदाराकडे दिलेले असून त्यांनी आपले काम काही मुलांना दिले आहे. त्यांच्या निष्काळजीपणामुळे वेळेवर बिल न मिळाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, ग्राहकांची बिले रजिस्टरमध्ये नोंदली जातात व ती डचड द्वारेही पाठवली जातात. मात्र प्रत्यक्षात अनेकांना ना डचड येतो, ना छापील बिल. त्यातच कोणतीही पूर्वसूचना न देता कनेक्शन तोडले जात असल्याने ग्राहकांमध्ये नाराजी आहे.

बिल भरण्यासाठी एकदम एवढी मोठी रक्कम कोठून आणायची? त्यामुळे ग्राहकांना वेळेवर वीजबिल मिळणे गरजेचे आहे.
– हणमंत चौधरी, सामाजिक कार्यकर्ते

वीजबिल नेहमी उशिरा मिळते. त्यामुळे दंड भरावा लागतो. बँकेत गर्दी होते, वेळ जातो. बिल वेळेवर मिळाल्यास सोयीचे होईल.
– सुर्यभान गवळी, चिखली (ता. मोहोळ)




# अक्कलकोट श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन वरोऱ्यात

**वरोरा । प्रतिनिधी**

अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन यंदाही वरोऱ्यात मोठ्या श्रद्धेने आणि भक्तीभावाने केले जाणार आहे. २६ एप्रिल २०२५ रोजी शनिवार, चैत्र कृष्ण १३/१४ च्या दिवशी श्रीराम मंदीर देवस्थान, वरोरा येथे हा पवित्र सोहळा आयोजित केला आहे.


या सोहळ्याची सुरूवात सकाळी ८ वाजता भुपाळीने होईल, त्यानंतर सकाळी ९ वाजता सामुहीक अभिषेक आयोजित केला जाणार आहे. सकाळी १०.३० वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांची आरती व महाप्रसाद वितरण होईल. सायंकाळी ६.३० वाजता पालखी पूजन व पालखी मिरवणुक काढली जाईल.



पालखी मिरवणुक श्रीराम मंदीर देवस्थान, सावरकर चौक, सपाटे चौक, बँक ऑफ महाराष्ट्र-श्रीराम नागरी पतसंस्था, जय भारतीय चौक ते राम मंदीर देवस्थान या मार्गावर पार पडेल.

श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या आशीर्वादाने आयोजित होणाऱ्या या सोहळ्यात सर्व भक्तजनांनी उपस्थित राहून श्री स्वामींच्या कृपाशीर्वादांचा लाभ घ्यावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

# शासकीय कुटीर रुग्णालयात 'कर्तव्य कसूर' करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करावी-युवासेनेची मागणी



**सोलापूर । प्रतिनिधी**

सोलापूर येथील कुटीर रुग्णालयात अपुऱ्या सुविधांमुळे आणि रिक्त असलेल्या पदांमुळे रुग्णांची हेळसांड होत असताना, काही डॉक्टरांच्या कर्तव्य कसूरीच्या प्रकरणांनाही समोर आले आहे. याप्रकरणी युवासेना तालुकाप्रमुख शंभूराजे फरतडे यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. गुंजकर यांच्याकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

मंगळवार, २२ एप्रिल रोजी साडे चार वाजता बंगाळवाडी येथील युवक वेताळ जगदाळे यांच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना खासगी गाडीतून कुटीर रुग्णालयात आणण्यात आले. त्यावेळी, वार्ड बॉय आणि प्रशिक्षार्थी डॉक्टरांनी पेशंटला आत घेतले. मात्र, ड्युटीवर असलेले डॉ. कदम खुर्चीवर आरामात बसले होते. पेशंट गंभीर जखमी असून मोठ्याने ओरडत असताना, डॉ. कदम प्राथमिक उपचार देण्याऐवजी पेशंटचे नाव सांगा, तात्काळ रेफर करा, असे सांगत होते.संबंधित डॉक्टरांनी पेशंटला तपासले नाही आणि त्याच्या नातेवाईकांना धीर दिला नाही. त्यांच्या प्रतिक्रियेमुळे गंभीर जखम असलेल्या पेशंटला अधिक त्रास सहन करावा लागला. काही वेळाने, डॉक्टरांनी माझी माणसं बघत आहेत, मी का उठू? असे सांगत पेशंटची स्थिती गांभीर्याने घेतली नाही.

कुटीर रुग्णालयात जखमी पेशंटसाठी डॉ. भोसले यांची नेमणूक असली तरी, तासभर होऊनही त्यांचं उपचार कसे नाहीत, आणि डॉक्टरांनी इतर खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार करत होते का, याबद्दल चौकशी होणे आवश्यक आहे.युवासेनेचे तालुकाप्रमुख शंभूराजे फरतडे यांनी डॉ. कदम यांच्यावर तात्काळ कारवाईची मागणी केली आहे, कारण जर त्यांचा स्वतःचा खासगी दवाखाना असता, तर त्यांनी असे वागले असते का?

# करमाळा तालुक्यात कागदोपत्री विकासाविरुद्ध संतापाची लाट

## मामाच्या काळातला कागदावरचा विकास वीट गावात दिसतोय बर का?

### संपूर्ण विकास कार्यांची प्रगती

५५ कोटी रुपये खर्चाच्या डिकसळ पुलाचे, ३९५ कोटी रुपयांच्या कुगाव शिरसोडी पुलाचे, २७१ कोटींच्या सावडी ते वेणेगाव रस्त्याचे, ४३ कोटींच्या उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे, आणि नवीन सबस्टेशन्सच्या कामांची सध्या जोरदार सुरूवात झाली आहे. विरोधकांना हे दिसत नसले तरी, मतदारांना हे सध्या प्रत्यक्ष दिसत आहे.
एड. अजित विघ्ने, प्रवक्ते शिंदे गट




विद्यमान आमदारांनी दहिगाव योजनेचे बंद नलिकेचे सुरू असलेले काम बंद पाडले. त्यांच्या कार्यकर्त्यांनी टक्केवारीसाठी पाईप जाळले हे जगजाहीर आहे. दहिगाव योजनेसाठी ११६ कोटी निधी मामांनी मंजूर केला होता, परंतु विरोधकांनी त्याच कामांना विरोध केला. त्यावर विद्यमान आमदार कागदोपत्री विकासाचे आरोप करत आहेत, आणि हे अधिक संतापजनक ठरत आहे.

**सोलापूर । प्रतिनिधी**

पाच महिन्यात पाच पैशाचाही निधी न आणू शकलेल्या विद्यमान आमदार नारायण पाटलांनी आता यापूर्वीचे आमदार कागदोपत्री विकास कसा करत होते यावर बोलण्यापेक्षा, पाच महिन्यात त्यांनी किती निधी आणला याचा हिशोब जनतेला द्यावा, अशी मागणी माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या समर्थकांनी केली आहे. शिंदे यांच्या कार्याचा उल्लेख करतानाच विद्यमान आमदारांनी आपले भविष्यकाळातील विकासाचे वचन दिले पाहिजे, अशी सल्ला गावांमधून दिला जात आहे.

मामाच्या काळातला कागदावरचा विकास वीट गावात दिसतोय बर का? या टॅगलाईनअंतर्गत व्हिडिओ आणि फ्लेक्सवर यापूर्वीच्या विकासकामांचे फोटो दाखवले जात आहेत. या फ्लेक्सवर विकासाच्या कामांचे प्रदर्शन करण्यात आले असून, ते व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यात्रेच्या काळात वीट येथील ग्रामस्थांनी हे फ्लेक्स लावले असून, इतर गावांचेही लक्ष यावर वेधले गेले आहे.

# लोकनेते स्व. संजय देवतळे यांच्या स्मृतीदिनानिमित्त नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी पर्यावरण व सांस्कृतिक मंत्री तथा लोकनेते स्व. संजय देवतळे यांच्या स्मृतीदिनानिमित्त येत्या शुक्रवार, दि. २५ एप्रिल रोजी नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर तसेच आयुष्यमान कार्ड वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सिद्धीविनायक मंगल कार्यालय, रेल्वे स्टेशन रोड, वरोरा येथे सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

स्व. संजय देवतळे हे मनमिळावू, समाजहितासाठी सतत झटणारे आणि नेहमी मदतीला धावून जाणारे लोकनेते होते. त्यांच्या स्मृती जपत त्यांच्या कार्यास सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्याचा हा उपक्रम असून, या स्मरण सोहळ्याचे उद्घाटन मंत्री महसूल, महाराष्ट्र राज्य मा. ना. चंद्रशेखर बावणकुळे यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ना. डॉ. अशोक उईके, मंत्री आदिवासी विकास व पालकमंत्री, चंद्रपूर हे राहणार असून प्रमुख उपस्थितीत हंसराज अहीर (अध्यक्ष, राष्ट्रीय मागासवर्ग आयोग), सुधीर मुनगंटीवार (आमदार तथा माजी मंत्री), बंटीभाऊ भांगडीया (आमदार, चिमूर), किशोर जोरगेवार (आमदार, चंद्रपूर), देवराव भोंगळे (आमदार, राजुरा), सुभाष धोटे (माजी आमदार, राजुरा) व प्रकाशचंद मुथा (माजी सभापती, जि.प. चंद्रपूर) हे आहेत .हा कार्यक्रम आमदार करण संजय देवतळे आणि स्व. संजय देवतळे मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला असून, कार्यक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून स्व. देवतळे यांच्या स्मृतींना अभिवादन करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शिरूर तालुक्यात ९६ ग्रामपंचायतींच्या सरपंचपद आरक्षणाची सोडत पार; राजकीय हालचालींना वेग

**शिरूर । रमेश बनसोडे**

शिरूर तालुक्यातील ९६ ग्रामपंचायतींसाठी सरपंचपदाच्या आरक्षणाची बहुप्रतिक्षित सोडत आज तहसिल कार्यालयाच्या सभागृहात पारदर्शक पद्धतीने पार पडली. या सोडतीसाठी विविध राजकीय गटांचे कार्यकर्ते, नागरिक, माजी सरपंच आणि इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोडतीत काहींच्या राजकीय आकांक्षा उंचावल्या तर काहींच्या अपेक्षांना धक्का बसला. सरपंचपद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित होणार, हे स्पष्ट झाल्यानंतर आता तालुक्याच्या आगामी निवडणुकांवरील लक्ष केंद्रित झाले आहे.

या सोडत कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून प्रांताधिकारी पूनम अहिरे आणि तहसिलदार बाळासाहेब म्हस्के उपस्थित होते. याव्यतिरिक्त, शेतकरी संघटनेचे बाळासाहेब घाडगे, वडगाव रासाईचे सरपंच सचिन शेलार, माजी सरपंच अरुण घावटे, विठ्ठल घावटे यांच्यासह अनेक मान्यवर देखील उपस्थित होते. सोडत पारदर्शक पद्धतीने पार पडावी, यासाठी विद्यार्थ्यांचा मदतीने सोडत काढण्यात आली.

**आरक्षणाचे तपशील:**आरक्षणाची सोडत पार पडली, त्यानुसार आरक्षित ग्रामपंचायतींचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

१. सर्वसाधारण महिला प्रवर्ग – ३० ग्रामपंचायती
२. सर्वसाधारण प्रवर्ग – २९ ग्रामपंचायती
३. ओबीसी सर्वसाधारण – १३ ग्रामपंचायती
४. ओबीसी महिला – १३ ग्रामपंचायती
५. अनुसूचित जाती सर्वसाधारण– ४ ग्रामपंचायती
६. अनुसूचित जाती महिला – ४ ग्रामपंचायती
७. अनुसूचित जमाती सर्वसाधारण – १ ग्रामपंचायती
८. अनुसूचित जमाती महिला – २ ग्रामपंचायती

**प्रमुख आरक्षित ग्रामपंचायती (प्रवर्गानुसार):**

अनुसूचित जाती महिला: मुखई, गोलेगाव, वाढु बुद्रुक, जांबूत

अनुसूचित जाती सर्वसाधारण: आमदाबाद, वाजेवाडी, निमगाव म्हाळुंगी, हिवरे

अनुसूचित जमाती महिला: वडगाव रासाई, माळवाडी

अनुसूचित जमाती सर्वसाधारण: कुरुळी

ओबीसी महिला: निमगाव भोगी, रावडेवाडी, निमोणे, नगरगाव, पिंपळसुटी, पिंपळे जगताप, पिंपरी दुमाला, सादलगाव, म्हसे बुद्रुक, शरदवाडी, वाडा पुनर्वसन, चव्हाणवाडी, कर्डे




ओबीसी सर्वसाधारण: वाघाळे, अण्णापूर, खैरेवाडी, पारोडी, खंडाळे, फाकटे, कोळगाव डोळस, मिडगुलवाडी, कवठे येमाई, आंधळगाव, गणेगाव खालसा, कासारी, कान्हूर मेसाई, कारेगाव

सर्वसाधारण महिला: आंबळे, कळवंतवाडी, धानोरे, टाकळी भीमा, आपटी, केंदूर, कोरेगाव भीमा, चिंचोली मोराची, शिंदोडी, उरळगाव, गणेगाव दुमाला, पाबळ, भांबर्डे, बुरुंजवाडी, खैरेनगर, विठ्ठलवाडी, आलेगाव पागा, शिक्रापूर, मोटेवाडी, डिंग्रजवाडी, कोंढापुरी, पिंपरखेड, वरुडे, निमगाव दुडे, निर्वी, बाभूळसर बुद्रुक, तर्डोबाचीवाडी, न्हावरे, दरेकरवाडी, गुनाट

सर्वसाधारण प्रवर्ग: शिरूर ग्रामीण, टाकळी हाजी, रांजणगाव गणपती, मांडवगण फराटा, सणसवाडी, मलठण, इनामगाव, ढोकसांगवी, चिंचणी, काठापूर खुर्द, वडनेर खुर्द, शिरसगाव काटा, चांडोह, करंदी, रांजणगाव सांडस, तांदळी, कर्डेलवाडी, तळेगाव, सोने सांगवी, दहिवडी, बाभूळसर खुर्द, संविदणे, सरदवाडी, जातेगाव बुद्रुक, धामारी, जातेगाव खुर्द, करंजावणे, पिंपरी खालसा

आरक्षण जाहीर झाल्यानंतर शिरूर तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. विविध गटांतील इच्छुक उमेदवार तयारीला लागले आहेत. सरपंचपदाचे आरक्षण, विशेषत: महिला प्रवर्ग, ओबीसी, आणि अनुसूचित जाती-जमातींचे आरक्षण, आगामी निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे. निवडणुकीच्या तयारीला लागलेल्या उमेदवारांच्या हालचालींमुळे राजकीय वातावरण तापले आहे.

तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सर्वसाधारण, महिला, ओबीसी, अनुसूचित जाती आणि जमातींमधील आरक्षणाच्या सोडतीनंतर संपूर्ण तालुका आगामी निवडणुकीकडे लक्ष ठेवून आहे.

# वर्धा शहरातील आरोग्याच्या हक्कासाठी 'वीर अशोक सम्राट संघटना'चा न्यायालयीन लढा


## सरकारी वैद्यकीय महाविद्यालय पुन्हा वर्धा शहरातच स्थापन होण्याची मागणी

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा शहरातील नागरीकांच्या आरोग्याच्या हक्कांसाठी आणि शहराच्या समृद्ध विकासासाठी वीर अशोक सम्राट संघटनाचा संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विक्की सवाई यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय वर्धा शहरातच पुन्हा स्थापन व्हावे, अशी मागणी केली आहे.ही याचिका झखड/१६१७१/२०२४ क्रमांकाने दाखल करण्यात आली असून त्यात भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयासह इतर संबंधित विभागांना पक्षकार करण्यात आले आहे. याचिकेत वर्धा शहरासाठी आधीच निश्चित केलेली साटोड़ा येथील १७.९३ हेक्टर जागा आणि त्यासाठी पूर्ण झालेली प्रशासकीय प्रक्रिया यांचा उल्लेख करून, प्रकल्प वर्ध्याच्या बाहेर हलवण्याच्या निर्णयाचा निषेध नोंदवण्यात आला आहे.

वर्ष २०२३ मध्ये नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्र्यांनी हा प्रकल्प हिंगणघाट तालुक्यात स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतला. यानंतर अजून एक पाऊल पुढे जात, हिंगणघाटहूनही प्रकल्प १२ किमी दूर असलेल्या जाम या गावात हलवण्याचा आदेश दिला गेला. विक्की सवाई यांनी या निर्णयांना 'अन्यायकारक आणि अतार्किक' असे संबोधून वर्धा शहर व जिल्ह्याच्या नागरिकांच्या आरोग्याच्या मूलभूत अधिकारांवर गदा आणणारे ठरवले आहे.सवाई यांच्या मते, वर्धा शहर जिल्ह्याचे केंद्र असून सर्व तालुक्यांतील लोकांसाठी येथे येणे सुलभ आहे. त्यामुळे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी वर्धा शहर हेच सर्वात योग्य स्थान आहे. यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना दर्जेदार उपचार उपलब्ध होतील, तसेच शहराचा आर्थिक व सामाजिक विकासही साधला जाईल.

वीर अशोक सम्राट संघटना २०२२ पासून सातत्याने या मागणीसाठी प्रयत्न करत आहे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना ३०० पेक्षा अधिक निवेदने देण्यात आली असून, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणही करण्यात आले होते. शासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याने अखेर उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागली.संघटनेने नागरिकांना आवाहन केले आहे की, या लढ्याला पाठिंबा द्यावा आणि वर्धा शहराच्या आरोग्य व विकासाच्या दृष्टीने आपली भूमिका ठामपणे मांडावी.






भद्रावती येथील विवेकानंद महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र तथा गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी विवेकानंद ज्ञानपीठ वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान, गोंडवाना विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे, विदर्भातील सेंद्रिय शेती तज्ज्ञ तथा विवेकानंद ज्ञानपीठ चे सहसचिव राजू गावंडे, बेहरीन रिटर्न प्रा. धनराज आस्वले, प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे

# जागतिक वसुंधरा दिन सृजनशील उपक्रमांनी साजरा

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

२२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. पर्यावरणाचे रक्षण आणि पृथ्वीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने केसरीमल नगर विद्यालयात राष्ट्रीय हरित सेनेच्या वतीने विविध सृजनशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.या दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृती निर्माण व्हावी यासाठी पर्यावरणाचा ऱ्हास व त्यावर उपाय, पाणी हे जीवन या विषयांवर निबंध, चित्रकला व रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांच्या माध्यमातून पर्यावरणीय समस्यांबद्दलची जाणीव प्रभावीपणे व्यक्त केली.

उन्हाळ्याच्या वाढत्या तापमानाचा विचार करता एक मूठ धान्य, ओंजळभर पाणी – मूक पशुपक्षांसाठी हा उपक्रम देखील विद्यार्थ्यांनी घरी आणि आजूबाजूच्या परिसरात उत्साहाने राबविला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी निसर्गप्रेम, सहवेदना आणि सामाजिक भानाचे उत्तम दर्शन घडविले.वर्ग ८ अ व वर्ग ९ ब मधील सुमारे ५० ते ६० विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांचा हेतू स्पष्ट होता – बालमनात पर्यावरणाविषयी प्रेम, संवेदनशीलता व जबाबदारीची भावना निर्माण करणे.कार्यक्रमाच्या आयोजनात राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक कोहळे व वर्षा गवारले यांनी विशेष पुढाकार घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक येखंडे सर आणि पर्यवेक्षक अनिल चांदेकर यांचे मार्गदर्शन लाभले.पृथ्वी ही आपले सर्वांचे घर आहे आणि तिचे रक्षण करण्याची जबाबदारीही आपलीच आहे, ही जाणीव या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये प्रभावीपणे रुजवण्यात आली.



# पीएमश्री लोकमान्य टिळक प्राथमिक शाळेत बक्षीस वितरण व निरोप समारंभ उत्साहात संपन्न

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

नगरपरिषद हिंगणघाट द्वारा संचालित पीएमश्री लोकमान्य टिळक प्राथमिक शाळेत वर्ग चौथीचा निरोप समारंभ व बक्षीस वितरण कार्यक्रम अत्यंत उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात चौथी वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांसह शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा वैशाली ताई चौधरी, सदस्य अशोक मोरे, राजेश तेलंग तसेच पंचायत समिती हिंगणघाटचे विषय साधनव्यक्ती नितीन सुकळकर यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक गिरीधर कोठेकर होते.या वेळी चौथीतील विद्यार्थ्यांनी शाळेत मिळालेल्या शिक्षणाचे आणि संस्कारांचे स्मरण करून आपल्या भावना व्यक्त केल्या. शाळेने दिलेले मार्गदर्शन व ज्ञान आम्हाला सदैव उपयोगी ठरेल, असे भावनिक मनोगत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

नितीन सुकळकर यांनी शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीचे कौतुक करत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे सांगितले. लवकरच ही शाळा नगरपरिषद क्षेत्रातील आदर्श शाळा म्हणून ओळखली जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे संचालन जेष्ठ शिक्षक शेषराव म्हैस्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन कविता चव्हाण यांनी केले. शाळेतील विविध उपक्रमांमुळे मुख्याधिकारी प्रशांत उरकुडे व प्रशासन अधिकारी (शिक्षण) प्रवीण काळे यांनी शाळेच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात शिक्षक चंद्रशेखर कोठेकर, मीना अडकिने, पालक संजय पुनवटकर, प्रियंका गावंडे, वहीद पठाण, गुलनाज परविन, अनिस शेख आणि प्रदीप टामटे यांचे विशेष योगदान होते.




# पहलगाम अतिरेकी हल्ल्याचा नाचणगाव येथे तीव्र निषेध




**पुलगाव । प्रतिनिधी**

काश्मीरमधील पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा भाजपा नाचनगाव गुंजखेडा-इंझाळा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र निषेध केला. नाचणगाव बस स्टॉप येथे आयोजित निदर्शनामध्ये हल्ल्यात बळी पडलेल्या हिंदू बंधू-भगिनींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या निदर्शनाचे नेतृत्व मंडळाच्या नवनिर्वाचित अध्यक्षा जयश्री मोकदम यांनी केले. यावेळी माजी पंचायत समिती सभापती किशोर गव्हाळकर, जेष्ठ नेते अरविंद नाकतोडे आदी उपस्थित होते. हल्लेखोर अतिरेक्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही या वेळी करण्यात आली.

# हिंदू देवतांबद्दल अपमानजनक वक्तव्य समाज माध्यमावर पोस्ट व्हायरल पुलगावमध्ये तणावाचे वातावरण




**पुलगाव । प्रतिनिधी**

शहरात समाज माध्यमावर हिंदू देवतांबद्दल अपमानजनक वक्तव्य करणारी एक व्हिडीओ पोस्ट व्हायरल झाल्याने शहरात संतप्त वातावरण निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने युवकांनी पुलगाव पोलीस स्टेशनमध्ये धरणे आंदोलन केले आणि आरोपींविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली.

ही घटना २२ एप्रिल रोजी घडली. समाज माध्यमावर प्रसारित झालेल्या व्हिडीओत हिंदू देवी-देवतांविषयी अपमानास्पद भाषा वापरण्यात आली होती. यामुळे शहरातील धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून युवकांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटला.

विश्व हिंदू परिषदेचे प्रखंड संयोजक अविनाश खोडे, रामजन्म शोभायात्रा समितीचे अध्यक्ष संदीप ठाकूर, भाजपचे माजी अध्यक्ष नितीन बडगे, सुधीर बांगरे, बजरंग दलाचे मिरज ब्राह्मणे यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी पोलीस स्टेशनमध्ये मोर्चा नेला. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत आरोपींना अटक करण्याची मागणी करण्यात आली.

याप्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल चव्हाण आणि पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे यांनी उपस्थित युवकांना कायदेशीर कारवाईची ग्वाही दिली. त्यांनी शांतता राखण्याचे आवाहन करत जमावास शांततेने घरी जाण्यास सांगितले. उपस्थितांनी त्यांच्या आवाहनाचा मान राखत आंदोलन स्थगित केले.दरम्यान, संबंधित महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तिला रात्रीच अटक केली आहे. सध्या ती पोलीस कोठडीत असून पुढील तपास सुरू आहे. पुलगाव पोलिसांकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

# मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्क कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

नवीन कल्पना आणि निर्मितीला चालना देण्यासाठी तसेच बौद्धिक संपदा हक्कांबाबत (खपींशश्रश्रशर्लीींरश्र झीेर्शिीीं ठळसहींी – खझठ) अधिक सखोल माहिती देण्याच्या उद्देशाने मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट येथे दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी आय.पी.आर. कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

ही कार्यशाळा तुळसकर कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. महेंद्र गुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. आपल्या सखोल आणि सोप्या मार्गदर्शनात डॉ. गुंडे यांनी बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व आणि दैनंदिन जीवनात यांची उपयुक्तता विविध उत्पादनांच्या उदाहरणांसह स्पष्ट केली. तसेच पेटंट्स आणि ट्रेडमार्क्स यासंबंधी सखोल माहिती उपस्थितांना दिली.कार्यक्रमास डॉ. नयना तुळसकर, सचिव, विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट यांची विशेष उपस्थिती होती. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स विभागांचे प्रमुखही या कार्यक्रमात उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सपना जयस्वाल यांच्या प्रस्तावनेने झाली. सूत्रसंचालनाचे काम प्रा. कोमल नांदुरकर यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. प्रणिता आष्टणकर यांनी केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापिका यांचीही कार्यशाळेला उत्स्फूर्त उपस्थिती लाभली



# आत्महत्येस प्रवर्त केल्याप्रकरणी आरोपीवर कठोर कार्यवाही करण्याची ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी

**गंगाखेड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील तृतीय वर्षांत शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थिनी साक्षी कांबळे हिने आत्महत्या केल्याने जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. साक्षीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणाऱ्या महाविद्यालयातील गुंड प्रवृत्तीच्या आरोपीवर मकोका अंतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने २३ एप्रिल रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गंगाखेड तहसीलदार यांच्यामार्फत निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

साक्षी कांबळे हिने धाराशिव येथील आपल्या मामाच्या घरी जाऊन गळफास घेत आत्महत्या केली. याच महाविद्यालयातील गुंड प्रवृत्तीच्या नराधम आरोपींनी साक्षीचे खाजगी फोटो प्रसार माध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी देऊन तिला ब्लॅकमेल केले. २० एप्रिल रोजी साक्षीचे लग्न होणार होते, परंतु आरोपींच्या त्रासाला कंटाळून तिने आत्महत्या केली.राज्य सरकार महिला आयोगाने आणि अनुसूचित जाती जमाती आयोगाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (ट्रॉसिटी क्ट) अंतर्गत तातडीने कार्यवाही करावी आणि कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.निवेदनावर ऑल इंडिया पँथर सेनेचे तालुकाध्यक्ष विकास रोडे, तालुका सचिव नितीन कांबळे, युवा तालुकाध्यक्ष श्याम पंडित, कॉंग्रेस महासचिव महावीरराजे घोबाळे, पत्रकार अशोक व्हावळे, जनक्रांती सेनेचे अध्यक्ष रोहिदास लांडगे, माजी नगरसेवक गौतम रोहिणीकर, बसपाचे शिवराज पैठणे, अमोल कांबळे यांची स्वाक्षऱ्या आहेत.



## माझे आरोग्य माझ्या हाती उपक्रम महिलांच्या आरोग्यासाठी ठरणार मैलाचा दगड

# माझे आरोग्य माझ्या हाती अभियानाच्या अंमलबजावणीसाठी आ.मुनगंटीवार यांच्या विनंतीनंतर मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक

## चंद्रपूर व कोल्हापूर जिल्ह्यात महिलांच्या आरोग्य तपासणी मोहिमेस मिळणार गती

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

महिलांच्या निरोगी आयुष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या माझे आरोग्य माझ्या हाती या अभियानाअंतर्गत चंद्रपूर व कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व महिलांची आरोग्य तपासणी पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप (झझझ) तत्वावर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयासाठी मंगळवार ( दि.२२) मंत्रालयात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक पार पडली.महिलांचे आरोग्य सुदृढ राहावे आणि संभाव्य आजारांचे लवकर निदान व्हावे, यासाठी ही मोहीम अत्यंत मोलाची ठरेल. या मोहिमेच्या जलद अंमलबजावणीसाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना पत्राद्वारे विनंती केली होती, त्यानंतर मंत्रालयात बैठक घेण्यात आली.

बैठकीस आमदार सुधीर मुनगंटीवार, आरोग्य विभागाचे आयुक्त, आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, स्त्री व प्रसूती रोग तज्ञ डॉक्टर संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. सुनिता तांदूळवाडकर, प्रकल्प संयोजक डॉ. कल्पना गुलवाडे, माजी अध्यक्षा डॉ. कल्पना घाटे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रतिनिधी डॉ. मंगेश गुलवाडे आणि प्रा. डॉ. सुरेखा तायडे यांची उपस्थिती होती.या बैठकीत चंद्रपूर जिल्ह्यात वैविध्यपूर्ण आरोग्य सुविधांची आवश्यकता लक्षात घेऊन आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सूचनांवर मंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. FOGSI व चंद्रपूर जिल्हा आरोग्य विभागातर्फे सादरीकरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत चंद्रपूर व कोल्हापूर जिल्ह्यातील स्त्रियांचे वजन, रक्तदाब, रक्तातील साखर (ब्लड शुगर) आणि हिमोग्लोबिन या ४ मूलभूत तपासण्याची मोहिम संपूर्ण स्वास्थ्य जन्म आरोग्य अभियान अंतर्गत राबविण्याचा मानस आहे. महाराष्ट्र शासनाचा आरोग्य विभाग आणि स्त्री व प्रसूती रोग तज्ञ डॉक्टर संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने या मोहिमेची अंमलबजावणी केली जाणार आहे. हा उपक्रम ग्रामीण आणि नागरी भागातील महिलांसाठी आरोग्यदृष्टीने एक महत्वाचा मैलाचा दगड ठरेल. असा विश्वास आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी व्यक्त केला.



## ढाणकी मंडळ तालुका भाजपा अध्यक्षपदी विक्रम राठोड यांची निवड
### बंजारा समाजात उत्साहाचे वातावरण



**उमरखेड | प्रतिनिधी**

बंजारा समाजाचे लोकभूषण, विकासपुरुष आणि माजी जिल्हा परिषद सदस्य उत्तमराव राठोड यांचे चिरंजीव तसेच युवा उद्योजक विक्रम राठोड यांची नुकतीच ढाणकी मंडळ तालुका भाजपा अध्यक्षपदी निवड झाली. त्यांच्या निवडीने भाजप पक्षाला नवसंजीवनी मिळाली असून बंजारा समाजात समाधानाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.विक्रम राठोड यांचा बंजारा समाजात दांडगा संपर्क असून, या समाजाचा भाजपकडे कल वळवण्यासाठी ते प्रभावी भूमिका बजावतील, अशी आशा व्यक्त होत आहे. ढाणकी परिसरात बंजारा समाजाची लोकसंख्या लक्षणीय असून, विक्रम राठोड यांच्या नेतृत्वामुळे पक्षाच्या कार्यात नवा जोम येईल, असा विश्वास भाजप कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.या निवडीबद्दल ग्रामीण व शहरी भागांतून विक्रम राठोड यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## कल्याणातील सर्वात वर्दळीच्या चौकात फिरत्या ट्रॉफिक सिग्नलचा अनोखा प्रयोग
### महिन्याभराच्या अभ्यासानंतर बसविण्यात येणार कायमस्वरूपी सिग्नल!



**ठाणे | प्रतिनिधी**

कल्याण शहरातील अरुंद रस्ते व वाढती वाहनसंख्या यामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. अपुरे मनुष्यबळ असल्याने प्रत्येक चौकात वाहतूक पोलीस नेमणे शक्य होत नाही. ही समस्या सोडवण्यासाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या विद्युत विभागाने सौरऊर्जेवर चालणाऱ्या फिरत्या ट्रॉफिक सिग्नल यंत्रणेचा प्रयोग सुरू केला आहे. हा प्रयोग सदानंद चौकात सुरू करण्यात आला असून, यामध्ये सौरऊर्जेवर चालणारी एक फिरती सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली आहे. कोणत्याही पूर्वचाचणीशिवाय शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत सिग्नल बसविल्यास आर्थिक नुकसान होऊ नये, म्हणून प्रयोग तत्त्वावर हा प्रकल्प राबवण्यात येत आहे.सदानंद चौक हा कल्याण पश्चिमेतील प्रमुख आणि अतिशय वर्दळीचा चौक आहे. इथे एकाच वेळी पाच दिशांनी वाहनांची ये-जा होते. त्यामुळे वाहतूक नियंत्रण करताना पोलिसांची चांगलीच कसरत होते.या यंत्रणेचा एक महिनाभर अभ्यास करून त्याचे परिणाम तपासले जातील. त्यानंतर स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत शहरातील विविध चौकात अशा प्रकारच्या सिग्नल यंत्रणा बसविण्यात येणार आहेत, अशी माहिती विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली.

## राजीव गांधी सार्वजनिक वाचनालय रावगाव येथे पुस्तक दिनानिमित्त व्याख्यान



**सोलापूर | प्रतिनिधी**

रावगाव, ता. करमाळा येथे पुस्तक दिनानिमित्त राजीव गांधी सार्वजनिक वाचनालयात पुस्तक माझा मित्र या विषयावर सामाजिक कार्यकर्ते हनूमंत गोडसे यांनी विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले. गोडसे यांनी वाचनाचे महत्त्व सांगत, वाचनाचे व्यसन जडवले पाहिजे आणि मोबाईलपासून दूर राहून पुस्तकांचे मित्र बनवले पाहिजे, असे आवाहन केले. वाचनाने माणसाला समृद्धी मिळते, अशी त्यांची धारणा होती.या कार्यक्रमात प्रमुख पाहूण्या म्हणून महेंद्र शिंदे आणि प्रताप राऊत यांनी वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.कार्यक्रमात प्राथमिक आरोग्य उपकेंद्र रावगावचे आरोग्य सेवक डोळस, कृष्णाई दूध संकलन केंद्राचे चेअरमन भरत धगाटे, महावीर कांबळे, सामाजिक कार्यकर्ते सुरेश फुंदे, राहुल पवार, प्रकाश कांबळे, बंडू पवार आणि सचिव भास्कर पवार उपस्थित होते.

## श्रीपाद ढेकळे ठरला बिटले येथील यमाई केसरी चा मानकरी

**मोहोळ | प्रतिनिधी**

संपूर्ण मैदान प्रेक्षकांनी खचाखच भरलेलं... हलग्यांचा कडकडाट... ‘श्री यमाई केसरी’चा मानकरी कोण होणार, याकडे लागलेल्या नजरा... अंतिम कुस्ती लागते आणि कुर्डुवाडीच्या आस्लम काझी यांचा पट्टा श्रीपाद ढेकळे टाकतो. चंद्रकांत काळे यांचा पट्टा सचिन मुळे, मोहोळ याच्यावर विजय मिळवत श्रीपाद ढेकळे याने 'श्री यमाई केसरी २०२५' चा मानकरी होण्याचा बहुमान पटकावला.



या कुस्ती स्पर्धेत द्वितीय विजेता विजय डोंगर (मलिकपेठ), तृतीय विजेता महेश खताळ (बिटले) आणि चौथा विजेता योगेश खताळ (बिटले) ठरले.मोहोळ तालुक्यातील बिटले येथील ग्रामदैवत श्री यमाई देवीच्या यात्रेनिमित्त यात्रा कमिटीच्या वतीने जंगी कुस्त्यांचे मैदान आयोजित करण्यात आले होते. या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील व डॉ. संतोष गुजरे यांच्या हस्ते पार पडले. मैदानाचे उद्घाटन कुस्तीरसिक पैलवान आस्लम काझी आणि समाधान घोडके यांच्या हस्ते करण्यात आले.स्पर्धेसाठी पंच म्हणून चंद्रकांत काळे व बाळासाहेब पाटील यांनी जबाबदारी पार पाडली, तर निवेदनाची धुरा अशोक धोत्रे यांनी सांभाळली.

## कासारे येथील जिल्हा परिषद शाळेत ‘चावडी वाचन’ उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये वाढली अभ्यासाची गोडी

**धुळे | उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील कासारे येथील जिल्हा परिषद कन्याशाळेत ‘निपुण भारत’ उपक्रमांतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान वाढविण्यासाठी ‘चावडी वाचन व गणन क्रिया’ हा सृजनशील उपक्रम राबवण्यात आला. पहिली ते चौथीच्या विद्यार्थिनींनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वाचन व गणितातील कौशल्य दाखवले.



कार्यक्रमात पहिलीच्या विद्यार्थिनींनी अंक मोजणी व शब्द वाचन करून दाखवले. दुसरी ते चौथीच्या विद्यार्थिनींनी कविता, पाढे व परिच्छेद वाचन सादर केले. गोष्टी, कविता, आकडेमोड व उदाहरणांच्या माध्यमातून मूलभूत साक्षरता व गणन कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला.मुख्याध्यापिका सुनीता पाटील, शिक्षक संजय जाधव, मालती सोनवणे, प्रफुल्ला जाधव व वैशाली भामरे यांनी उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. शिक्षक व शिक्षिकांनी सर्जनशील उपक्रम आखून विद्यार्थिनींना सहभागी करून घेतले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी वाढली असल्याचे पालकांनी सांगितले.या उपक्रमास जिल्हा परिषद सदस्य गोकुळ परदेशी, मधुकर देसले, शेतकी संघाचे माजी संचालक अविनाश खैरनार, विनायक देसले, शिवाजी खैरनार, प्रकाश देसले, चंद्रकांत खैरनार, विलास देसले, अनिल देसले, योगेश जगताप आदींसह अनेक पालक उपस्थित होते.

## माहेरावरून १० लाख रुपये आणा, अन्यथा घरात ठेवणार नाही; विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ

**वैजापूर | अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील एका विवाहितेने आपल्या पतीसह सासरच्यांविरोधात शारीरिक व मानसिक छळ केल्याची तक्रार पोलिसांत दाखल केली आहे. माहेरून १० लाख रुपये आणा, अन्यथा घरात ठेवणार नाही, अशी धमकी देत वारंवार छळ करण्यात आल्याचा गंभीर आरोप तिने केला आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

तक्रारीनुसार, पीडित महिलेचा विवाह १६ एप्रिल २०१४ रोजी शंकर दत्तात्रय पैठणकर यांच्यासोबत वैजापुरमधील लॉन्समध्ये पारंपरिक पद्धतीने झाला होता. लग्नानंतर सुरुवातीची तीन वर्षं सर्व काही सुरळीत होतं, मात्र त्यानंतर पती आणि सासरच्यांनी सातत्याने पैशांची मागणी करत



शिवीगाळ, मारहाण आणि मानसिक छळ सुरू केला. पीडितेच्या म्हणण्यानुसार, पती शंकर यांना मद्यपानाची सवय असून, ते रात्री उशिरा दारू पिऊन येत आणि पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत शिवीगाळ करत. सासरच्या मंडळींनी मिळून विवाहितेकडून माहेरावरून १० लाख रुपये आणण्याची मागणी करत तिला आणि तिच्या दोन मुलींना त्रास देण्यास सुरुवात केली. या प्रकरणी तिने यापूर्वी वैजापुर न्यायालयात तक्रार दाखल केली होती. समुपदेशनानंतर दोघांमध्ये समझोता झाला होता. मात्र, सासरच्यांच्या वागणुकीत काहीही सुधारणा झाली नाही.१६ एप्रिल २०२५ रोजी पुन्हा एकदा पैशासाठी छळ करण्यात आला आणि तिला तिच्या दोन मुलींसह घराबाहेर काढण्यात आलं, असं तिने पोलिसांना सांगितलं. आता ती माहेरी राहत असून, आपल्याला आणि मुलींना जिवीत धोका असल्याची भीती तिने व्यक्त केली आहे. तसेच दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तिने केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शंकर दत्तात्रय पैठणकर, सासू सुमन पैठणकर, सासरे दत्तात्रय पैठणकर आणि भाऊ रामेश्वर पैठणकर यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

## पुस्तके, ग्रंथ जगण्याची दिशा देतात-तहसीलदार संजय भोसल



**पिशोर | जावेद शेख**

'वाचन दिन' निमित्त शाळेच्या वाचनालयाला पुस्तके भेट देत असताना सिल्लोडचे तहसीलदार संजय भोसले यांनी एक महत्त्वपूर्ण विचार मांडला. ते म्हणाले, प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात पुस्तके आणि ग्रंथ यांचा महत्त्वपूर्ण भाग आहे. महामानव, विचारवंत, क्रांतिकारक, संत महंत यांचे जीवन पाहिल्यावर पुस्तकांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. म्हणून पुस्तक निर्माण करणे, जपणे आणि वाचणे हेच आपल्याला योग्य दिशा देणारे आहे. वाचनानेच समाजाला जागतिक क्रांती दिली आहे.

शिवाय, 'जागतिक पुस्तक दिन'ाच्या निमित्ताने अशोकदादा गरुड शैक्षणिक समूहाच्या ज्ञानविकास विद्यालयात आयोजित कार्यक्रमात भोसले यांनी ज्ञानविकास विद्यालयातील 'साहित्यिक ना. धो. महानोर' वाचनालयाला पुस्तके भेट दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, वाचलेल्या पुस्तकावर आधारित अहवाल तयार करा. हा अहवाल जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्यापर्यंत पोहोचवला जाईल. स्वामी साहेबांना शिक्षण, वाचन, लेखन आणि संशोधन या क्षेत्रांत खूप रस आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्यासाठी मी त्यांची भेट निश्चित करीन.कार्यक्रमात दुर्गेश गिरी, नरेश कुलकर्णी, गोराडे, भोटकर, तसेच ज्ञानविकास विद्यालयाचे मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंद उपस्थित होते. शालेय वाहनाचे चालक मालक देखील यावेळी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .